|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

जा.क्र.कबचौउमवि/रासेयो-१४-क/अध्यादेश/१६३/**१७२**/२०२२ दि.१४/०५/२०२२

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक/विभाग प्रमुख /कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजनेचे एकक असलेले महाविद्यालये
मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांना...

**विषय :-** विद्यापीठ अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहन गुणांचे अर्ज व याद्या सादर करणेबाबत...

**महोदय / महोदया ,**

राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) यात सहभागी होऊन सलग दोन शैक्षणिक वर्षात सहभाग व त्या कालावधीत एक विशेष शिबीर पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार विद्यापीठ अध्यादेश १६३ तरतूदी अंतर्गत प्रोत्साहनपर १० गुणांचा लाभ देण्यात येत असतो.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ या सलग शैक्षणिक वर्षात **राष्ट्रीय सेवा योजनेत (NSS)** सहभागी होऊन एक विशेष शिबीर पूर्ण केलेल्या विद्यार्थी म्हणून उल्लेखनिय कार्य करून मिळविलेल्या प्राविण्य प्रमाणपत्र धारकाकडून अध्यादेश १६३ नुसार प्रोत्साहनपर गुणलाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहेत.

त्याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत पत्रकात नमूद केलेल्या निर्देशानुसार पात्र विद्यार्थ्याचे प्रोत्साहनपर गुणलाभासाठी विहीत अर्ज व याद्या संबधीतांची लेखी परीक्षा सुरु होण्यापूर्वी **किमान पाच दिवस** आधी प्रस्तावात नमूद स्थळी कार्यक्रम अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थितीत आपले प्रतिनिधीसह रासेयो विभाग आणि जिल्हा समन्वयक यांच्याकडून पडताळणी करुन विद्यापीठ प्रतिनिधीकडे सादर करावयाचे आहेत.

### NSS च्या विद्यार्थ्यांचे गुणलाभाचे अर्ज स्वकृती करण्याविषयी सूचना -

१.उपरोक्त प्रमाणेच्या गुणलाभासाठी सादर करण्यात आलेले अर्ज परिपूर्ण भरलेले त्यावर अर्जकर्त्यांची (विद्यार्थी) स्वाक्षरी असावी. सोबत विद्यार्थी स्वयंसेवक दैनदिनीची छायांकीत प्रत (Photo Copy) जोडावी.अर्जात खाडाखोड असणार नाही याची काळजी घेण्यात यावी. तसेच सदर अर्जावर विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी व मा. प्राचार्य / संचालक यांची स्वाक्षरी करण्यापूर्वी अर्जकर्त्या विद्यार्थ्याने यापूर्वी प्रोत्साहनपर गुणलाभासाठी अर्ज केला नसल्याची खात्री करावी. तद्नंतरच संबधित अर्जावर शिफारसीसह स्वाक्षरी करावी.त्याशिवाय असे एकत्रित अर्ज व याद्या स्वीकारल्या जाणार नाहीत.

२.विद्यार्थ्यांनी अर्जात नमूद तक्यातील माहिती बिनचूक भरणे आवश्यक आहे. त्यात बऱ्याच अर्जामध्ये रासेयो एककांनी विद्यापीठास सादर केलेल्या यादीतील क्रमांकात ताळमेळ दिसून येत नाही. पर्यायाने विद्यार्थ्यांचे नांव शोधतांना बराच वेळ जातो. त्यामुळे प्रस्तुत विद्यार्थ्यांचा रासेयो यादीतील पहिल्या व दुसऱ्या वर्षातील क्रमांक व त्याचा विशेष शिबीर उपस्थिती यादीतील क्रमांक बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्याचा कायम नोंदणी क्रमांक (P.R. Number) व परीक्षेसाठी विद्यापीठाने दिलेला बैठक क्रमांक (Seat Number.) नमूद करणे आवश्यक आहे. त्याशिवाय त्या विद्यार्थ्यांस गुणलाभ देता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३.राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सलग २ वर्ष म्हणजे प्रथम वर्ष २०२०-२१ व द्वितीय वर्ष २०२१-२२ या दरम्यान १ विशेष शिबिर केलेले असेल अशाच विद्यार्थ्यांचे गुणलाभाचे अर्ज पाठविण्यात यावेत. रिपीटर किंवा कोणत्याही कारणाने शैक्षणिक वर्षाचा खंड असलेल्या विद्यार्थ्यांचे अर्ज पाठवू नयेत. तसेच सदर अर्ज हे त्या त्या **वर्ग व विद्याशाखा** निहाय **(Class & Faculty wise )** पत्रकात नमूद स्थळी लेखी परीक्षा सुरु होण्यापुर्वी किमान पाचदिवस अगोदर सादर करावेत.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या दि.२१/०२/२००७ रोजी झालेल्या ठराव क्र. व्य.प.ए - ३४/२००७, व्य.प.ए - ३८/२००७ अन्वये सुधारीत अध्यादेश दि.२१/०२/२००७ पासून पारीत करण्यात आला असल्याने व सुधारीत अध्यादेशात हाताळणी शुल्क आकारणे संदर्भात कोणताही उल्लेख नसल्याने विद्यार्थ्यांकडून हाताळणी शुल्क आकारण्यात येऊ नये वा विद्यार्थ्यांकडून अर्जासाठी कोणतेही शुल्काची मागणी करण्यात येऊ नये.

आपणास पुनश्च विनंती की, प्रस्तुत पत्रक व सहपत्र-नमूने यांचा आशय संबधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S) मध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय कार्य केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे गुणलाभ मागणी अर्ज व याद्या पत्रकात नमूद संबधीत स्थळी आपले प्रतिनिधी यांनी विभाग आणि जिल्हा समन्वयक यांचे कडून पडताळणी करुन विद्यापीठ प्रतिनिधीकडे सादर करावयाचे आहेत.

**विशेष सूचना -**

१.पत्रकात नमूद निर्धारीत कार्यक्रमानुसार महाविद्यालयातील **रासेयो कार्यक्रम अधिकाऱ्यांनी** गुणलाभासाठीचे अर्ज सादर करण्यास येतांना राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेशित विद्यार्थ्यांची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ ची नियमित यादी तसेच दोन्ही वर्षातील विशेष शिबीरांचे उपस्थितीपत्रकांच्या सत्यप्रती सोबत आणाव्यात.

२.पत्रकात नमूद कार्यक्रमानुसार आपल्याकडील गुणलाभाचे अर्ज व याद्या कार्यक्रम अधिकाऱ्याच्या उपस्थितीत तपासून त्याला अंतीम स्वरूप रासेयो विभाग व जिल्हा समन्वयक यांचेकडून तपासणीन्वये देण्यात येईल. त्यामुळे निर्धारीत कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत गुणलाभाचे अर्ज व याद्या स्वीकारल्या जाणार नाहीत.

३.अर्ज व विद्याशाखानिहाय याद्या सादर करतांना त्यावर संपूर्ण माहिती , विद्यार्थ्याचा कायम नोंदणी क्रमांक (P.R. Number) आणि परीक्षेसाठी विद्यापीठाने दिलेला बैठक क्रमांक (Seat Number.) नमूद केलेला आहे किंवा नाही याची खात्री करावी. तसेच त्यावर विद्यार्थी, कार्यक्रम अधिकारी व मा.प्राचार्य/ संचालक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत किंवा नाही याची सुध्दा खात्री करावी. अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्यांचा माहे जून / जुलै- २०२२ मध्ये होणाऱ्या परीक्षेचे प्रवेशपत्राची (Hall Ticket) सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील.

४.एकत्रित अर्जासोबत आवश्यक प्रपत्र -अ व प्रपत्र-ब बिनचुक भरुन सादर करावेत वरील अर्ज केद्रिय पध्दतीने लेखे (Central Audit) तपासणी कार्यक्रमाच्या ठिकाणी जमा करावेत:-

५.राष्ट्रीय सेवा योजनेत प्रवेशित विद्यार्थ्याची शैक्षणिक वर्ष २०२०-२१ व २०२१-२२ दरम्यान दोन वर्ष नियमित कार्यक्रम व त्याच काळात एक विशेष शिबीर पुर्ण करणाऱ्या स्वयंसेवकांचे **प्रमाणपत्र कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख यांच्या स**ह विहीत पध्दतीने याच दरम्यान विद्यापीठाकडे सादर करावयाची आहेत. यानंतर प्राप्त प्रमाणपत्रांचा विचार केला जाणार नाही.पत्रकातील नमूद सुचनांप्रमाणे अर्ज व याद्या तयार करुन तपासणी कार्यक्रमाच्या ठिकाणी **लेखी परिक्षासुरु होण्याच्या पाच दिवस** अगोदर जमा करावेत.

**टिपः-** एखाद्या महाविद्यालय/ परीसंस्था/ प्रशाळा -विभाग यांच्या कडील पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज स्वीकृती कालावधी नंतर सुरु होत असतील त्या परीक्षा सुरु होण्यापूर्वी **किमान पाच दिवस अगोदर** सदर अर्ज आपल्या रासेयो विभाग-जिल्हा समन्वयक यांचे कडून पडताळणी करुन विद्यापीठ रासयो विभागाकडे त्वरीत जमा करावेत विलंबाने प्राप्त होणारेअर्ज स्विकृत केले जाणार नाहीत.

आपला विश्वासू,

**(डॉ.सचिन ज.नांद्रे)**
संचालक, राष्ट्रीय सेवा योजना

**सोबत :-** प्रोत्साहन गुणलाभ अर्ज नमूना, प्र-पत्र-अ व प्रपत्र-ब

**प्रतिलिपी**:-१) विभाग-जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक
२) मा.संचालक,परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत :-** १) विभाग प्रमुख,कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव
२) विभाग प्रमुख,प्र-कुलगुरु कार्यालय,कबचौउमवि,जळगाव
३) विभाग प्रमुख,कुलसचिव कार्यालय,कबचौउमवि,जळगाव
४) जपसंपर्क अधिकारी,कबचौउमवि,जळगाव
५) पध्दती विश्लेषक, संगणकशास्त्र,कबचौउमवि,जळगाव -कृपया सदरच्या पत्रकास प्रसिध्दी व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकट करण्याची कार्यवाही करावी.

D: kka Ord. 163 Circular 45

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहनपर गुणलाभासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या (NSS) स्वयंसेवकांनी करावयाच्या अर्जाचा नमूना

✦ विद्यार्थी /विद्यार्थिनीचे नांव : -----------------------------------------------------------------

✦ **Students Name** (Surname First) : -----------------------------------------------------------------

✦ महाविद्यालय/ संस्था / प्रशाळेचे नांव : ---------------------------------------------------------------

महाविद्यालयास परीक्षा विभागाने दिलेला सांके. कोड: -----------------------------------------------------

✦ विद्यार्थ्यांचा प्रवेशित वर्ग : -----------------------------------------------------------------

✦ संवर्ग : SC / ST / NT / OBC / SBC / Open

✦ प्रोत्साहनपर गुणलाभ मिळण्यासाठी आवश्यक तपशील :

| शैक्षणिक वर्ष | विद्यापीठास सादर केलेल्या यादीतील क्रमांक | कायम नोंदणी क्रमांक (P R.Number) | जुन / जुलै २०२२ मध्ये देण्यात येणाऱ्या परीक्षेचा बैठक क्रमांक (Seat Number) | विशेष शिबीरातील सहभाग- गावाचे नांव व यादीतील क्रमांक-वर्ष | जिल्हा/विद्यापीठ/राज्य/राष्ट्र स्तरावरील उपक्रमात सहभाग घेतला आहे का? |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम वर्ष | | | | | |
| द्वितीय वर्ष | | | | | |

✦ यापूर्वी प्रोत्साहनपर गुणलाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे का? होय / नाही

असल्यास तपशील ------------------------------
--------------------------------

• **सोबत -** माहे जुन / जुलै 2022 च्या परीक्षेच्या प्रवेश पत्राची सत्यप्रत जोडणे आवश्यक. (विद्यार्थ्यांची स्वाक्षरी )

---

### शिफारस पत्र

प्रमाणित करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (NSS) उपक्रमातील प्रवेशित विद्यार्थी / विद्यार्थिनी ---------------------------------------------------------- याने / हिने केंद्र व राज्य शासनाने निर्धारीत केलेल्या निर्देशानुसार -------------------------------- या शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरात सहभाग घेऊन २४० तास समाधानकारक रित्या काम पूर्ण केले आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांस / विद्यार्थिनीस माहे जुन/जुलै 2022 परीक्षेसाठी अध्यादेश १६३ अंतर्गत प्रोत्साहनपर गुणलाभ देण्यास शिफारस करण्यात येत आहे. प्रस्तुत विद्यार्थी /विद्यार्थिनीने यापूर्वी सदर योजनेत प्रोत्साहनपर गुण मिळण्यासाठी अर्ज केलेला नाही वा लाभ घेतलेला नाही याची खात्री केली आहे.

**रासेयो कार्यक्रम अधिकारी** **मा.प्राचार्य / संचालक**
(महाविद्यालयाचा शिक्का)

प्रस्तूत अर्जाचर पडताळणी केली प्रोत्साहनपर गुणासाठी पात्र/अपात्र 10 गुण - मान्य/ अमान्य

विभाग रासेयो समन्वयक, जिल्हा रासेयो समन्वयक , **संचालक, राष्ट्रीय सेवा योजना**

*अपूर्ण किंवा चुकीची माहिती भरलेल्या अर्जाचा गुणलाभ देण्यासाठी विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

प्रपत्र-अ

राष्ट्रीय सेवा योजनेतील पात्र विद्यार्थ्यांना अध्यादेश १६३ अतंर्गत तरतूदीनुसार प्रोत्साहनपर (१०)गुण मिळण्यासाठी विहीत यादीचा नमूना

| अ.क्र. Sr.No | विद्यार्थी नाव (Name of The Student) | संवर्ग Category | वर्ग Class | नोंदणी क्रमांक P.R.N. | परीक्षा क्रमांक Exam. Seat No. | रासेयो सहभाग | | | शेरा Remark |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | प्रथम वर्ष नियमित यादी क्रं. FY List No | व्दितीया वर्ष नियमित यादी क्रं. SY List No | विशेष शिबीर स्थळ Special Camp Place | |
| 1 | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येते की,अध्यदेश १६३ च्या तरतूदीनुसार उपरोक्त यादीतील अ.क्र ते वर नमूद विद्यार्थी प्रोत्साहनवर दहा (१० गुण ) मिळण्यासाठी पात्र आहेत.

रासेयो कार्यक्रम अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख कार्यक्रम अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

विभागरासेयो समन्वयक
स्वाक्षरी व शिक्का

जिल्हा रासेयो
स्वाक्षरी व शिक्का

प्रपत्र-ब

तक्ता-विद्याशाखा व संवर्ग ( Faculty & Category)

| शाखा Faculty | | अ.जा. S.C | अ.ज. S.T | वि.जा.भ.ज. V.J.N.T | वि.ता.प्र. E.S.B.C | इ.मा.व O.B.C | खुला OPEN | एकूण Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदवी U.G | मुले Boys | | | | | | | |
| | मुली Girls | | | | | | | |
| पदव्युत्तर P.G | मुले Boys | | | | | | | |
| | मुली Girls | | | | | | | |
| एकूण Total | | | | | | | | |

रासेयो कार्यक्रम अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख कार्यक्रम अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

विभाग रासेयो समन्वयक
स्वाक्षरी व शिक्का

जिल्हा रासेयो
स्वाक्षरी व शिक्का